# सुचना : स्वाधार योजनेबाबत (SC Caste) विद्यार्थ्यांनकरिता. (FY to B.Tech/MCA/M.Tech)

Ref. No. : PCCoE/Swadhar/2024-25/ 875 — Date : 17/12/2024

या योजनेअंतर्गत राज्यातील **अनुसूचित जाती व नवबौध्द** प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर (पदवी व पदव्युत्तर पदवी) शिक्षण घेण्यासाठी शासकीय वसतिगृहात प्रवेश नसणा-या विद्यार्थ्यांना वार्षिक खर्चासाठीची रक्कम संबंधीत विद्यार्थ्याच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येईल.

**स्वाधार योजनेचे अर्ज विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org** या पोर्टलवर ऑनलाईन भरायचे आहेत. ज्यांचे **नवीन** (New) व **नुतणीकरण** (Renewal) आहे त्यांनी वेबसाईटवर **Applicant Information** या टॅबवर Are you new Fresh/**नवीन** विद्यार्थ्यांनी New सिलेक्ट करायचे आहे तसेच **नुतणीकरण विद्यार्थ्यांनी Existing** select करायचे आहे व त्यानंतर Apply for Hostel or Swadhar Service? **Swadhar** select करायचे आहे.

**फॉर्म भरतान पुढीलप्रमाणे** कागदपत्रे अपलोड व सादर करावीत :-

१. जातीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.
२. विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
३. उत्पन्न दाखला
४. दहावी ते आत्तापर्यंत तुम्ही शिकत आहात त्या सर्व मार्कशिट व शाळा सोडल्याचा दाखला (LC/TC).
५. बोनाफाईड सर्टिफिकेट
६. रेंट ॲग्रिमेंट
७. आपले महाविद्यालय पालिका हद्दीच्या ५ कि.मी.आत असल्याचे प्रमाणपत्र
८. उपस्थिती प्रमाणपत्र ई.

अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी शासन निर्णय क्रमांक : बीसीएच-२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण-२ दिनांक : १३ जून, २०१८ पहावा.

**स्वाधार योजनेचा अर्ज विद्यार्थ्यांनी दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत ऑनलाईन भरून स्कॉलरशिप विभागात कागदपत्रासोबत जमा करावेत.**

Dr. Govind N. Kulkarni
Director

O/C

Pimpri Chinchwad College of Engineering — An Autonomous Institute — Nigdi, Pune-44

CC to : 1. H.O.D.,Mech/E&Tc/Comp/I.T./Civil/AIML/RL/FY/SY/TY/B.Tech/M.Tech/MCA All Year's request to circulate in all classes & Display on notice board.
2. Boys and Girls Hostel
3. Prof. Ketan Desale - please upload on college website.
4. Office copy.

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे-१
दूरध्वनी क्र०.२०-२६१२७५६९ ईमेल - sakalyangovthostel@gmail.com

क्र.सकआ/शिक्षण/स्वाधार/सन २०२४-२५ अर्ज मुदत/ ३१.१२.२०२४ पर्यंत/२०२४-२५/का-५अ/ पुणे, दिनांक: .१२.२०२४.

प्रति,
१) प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण (सर्व)
२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)

विषय: सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज दिनांक ३१/१२/२०२४ पर्यंत स्विकारणेस मुदतवाढ देणेबाबत...

संदर्भ: १) आयुक्तालयाचे परिपत्रक क्र.२४९४, दिनांक ३१.०७.२०२४.
२) आयुक्तालयाचे पत्र क्र.३२५३, दिनांक १४.१०.२०२४.
३) आयुक्तालयाचे मुदतवाढ पत्र क्र.३६४५ दिनांक २८.११.२०२४

आयुक्तालयाचे संदर्भ परिपत्रकान्वये शासकीय वसतिगृह प्रवेश व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना **https://hmas.mahait.org** या पोर्टलवर ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत. याबाबतचे अर्ज ऑनलाईन पोर्टलव्दारे स्विकारण्यात येत आहेत.

अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पोर्टलव्दारे दिलेल्या मुदतीत ऑनलाईन अर्ज सादर केलेले आहेत आणि या प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीव्दारे आपोआप स्वाधार योजनेसाठी वर्ग होणार आहेत अशा विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेसाठी नव्याने अर्ज सादर करण्याची आवश्यकता नाही.याबाबत सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी असेही कळविण्यात आलेले आहे.

विद्यार्थ्यांचे उशिरा सुरू होणारे शैक्षणिक सत्र, सद्यस्थितीत स्वाधार योजनेचा लाभ घेत असलेले विद्यार्थी तसेच नव्याने स्वाधार योजनेसाठी अर्ज करणारे विद्यार्थी यांना ऑनलाईन अर्ज करताना तांत्रिक अडचणी येत आहेत. काही विद्यार्थी संघटना आणि क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांनी मुदतवाढ देण्याबाबत मागणी केली आहे. या बाबी विचारात घेता अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून संदर्भ पत्र क्र.३ अन्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दिनांक १६ डिसेंबर, २०२४ पर्यंत यापूर्वी वाढविण्यात आली होती.

आता आयुक्तालय स्तरावरून सर्व प्रादेशिक उपआयुक्त यांचा स्वाधार योजनेच्या ऑनलाईन पोर्टलवरील अर्जांबाबत दूरध्वनीव्दारे आढावा घेतला असता पुन्हा वरील कारणासाठी क्षेत्रीय कार्यालयासह विद्यार्थी/संघटना यांनी मुदवाढ देण्याबाबत मागणी केली आहे. ही बाब विचारात घेऊन अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्याचे हित लक्षात घेता **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

त्याचप्रमाणे सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सध्या अस्तित्वात असलेल्या किंवा सद्यस्थितीत स्वाधार योजनेचा लाभ घेत असलेल्या विद्यार्थ्याचे ऑनलाईन अर्ज या मुदतवाढीच्या कालावधीतच भरून घेण्याची कार्यवाही याच मुदतीत करावी.

Signed by Om Prakash
Bakoria
Date: 16-12-2024 17:07:23

(ओम प्रकाश बकोरिया)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत: कार्यवाहीस्तव.

प्रकल्प अधिकारी, महाआयटी कॉर्पोरेशन लिमिटेड, एपीजे हाऊस, चर्चगेट, मुंबई १

यांना सूचीत करण्यात येते की, या पत्रान्वये स्वाधार योजनेसाठी विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची मुदत दिनांक ३१.१२.२०२४ रोजीपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. याबाबत स्वाधार योजनेच्या पोर्टलमध्ये या मुदतीपर्यंत अर्ज स्विकारण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करावी.